# आर्ट्स प्रॅक्टिस

*आर्ट्स प्रॅक्टिस कार्यक्रमाचे पुनरवालोकन, जस्टिन जस्टिन मॅकार्थी, नीलम मानसिंग, गीतांजली राव आणि संजय काक यांच्या तज्ञ समितीने, २०२० साली केले होते. पुनरवालोकन प्रक्रियेला मदत व्हावी म्हणून, आम्ही, भारतातील कलाक्षेत्रातून आणि कल्याणकारी संस्थांकडून, कलाप्रांताला गरज असणाऱ्या सहाय्याविषयी, मते मागवली होती (आमचा, दृक्श्राव्य कला आणि चित्रपट आणि प्रयोग आणि साहित्य या संदर्भातील, 'व्हॉईसेस फ्रॉम द फिल्ड' अहवाल पहावा). समितीने, आयएफएला काही एक शिफारशी केल्या होत्या आणि हा आर्ट्स प्रॅक्टिस कार्यक्रम त्या शिफारशींचा परिपाक आहे.*

**आर्ट्स प्रॅक्टिस** कार्यक्रम असे प्रकल्प राबवू इच्छितो की जेणेकरून कलाकारांना त्यांच्या सध्याच्या कलानिर्मितीचा पल्ला नवीन दिशेला वाढवता येईल. प्रायोगिकतेचं मूलतत्व पायाभूत ठेऊन, इथे रूढींना आव्हान दिलं जाऊ शकेल, विषयांची, आकृतिबंधांची आणि माध्यमांची व्याप्ती वाढवली जाऊ शकेल, अवकाश, प्रेक्षक आणि समाज यांना खिळवून ठेवण्याचे नवीन मार्ग शोधता येतील.

प्रकल्पांचं स्वरूप हे, नाविन्यपूर्ण कल्पनांचा पाठपुरावा करणे, कलात्मक निर्मिती करणे, वैचारिक आदानप्रदान आणि परिसंवादातून संवाद साधणे, निवासी कार्यक्रम आणि कार्यशाळा करणे, यांसाठी संधी उपलब्ध करून देणे आणि कलाकारांमधली वीण घट्ट होण्यासाठी व्यासपीठं वाढविणे, असं असू शकतं. हा प्रकल्प, इंग्लिशव्यतिरिक्त भारतीय भाषांमधे काम व्हावं आणि वेगवेगळ्या कलाप्रांतात सहकार्य वाढावं यासाठी प्रोत्साहन देईल. आयएफएच्या कर्मचाऱ्यांबरोबर चर्चा करून, तुम्ही तुमचा प्रस्ताव, लेखी किंवा दृक्श्राव्य स्वरूपात तयार करू शकता.

या कार्यक्रमांतर्गत, खालील विभागांत, प्रकल्प राबविण्यात येतील:

1. **शोध**:
   ज्या कल्पना नाविन्यपूर्ण, धक्कादायक किंवा अभूतपूर्व आहेत त्या पडताळून पाहणे, त्यांचा प्रयोग करणे आणि त्यांच्याशी खेळ करून पाहणे; यांत पुढे जाऊन प्रत्यक्ष कलानिर्मिती होऊ शकेल अथवा शकणार नाही. यांत, संशोधन करणे, स्क्रिप्ट लेखन, कल्पनारंजन (jamming), कथारचना (storyboarding), कलाभ्यास (rehearsing), प्रयोग करून पाहणे आणि इतर संशोधनात्मक कार्याशी निगडीत कल्पनांचा समावेश असेल.
   *अर्थसहाय्य (Budget)*: जास्तीतजास्त रुपये ७५,०००/-
   *कॅलेंडर*: प्रस्ताव, वर्षातून एकदा, खुल्या स्पर्धेतून, मागविण्यात येतील.

2. **निर्मिती**:
   सादरीकरण, दृक्श्राव्य, डिजिटल, साहित्यविषयक किंवा यांतील कोणतेही प्रकार घेऊन एकत्रित कलानिर्मिती करणे. यांत नाट्यनिर्मिती, नृत्य आणि सांगीतिक कार्यक्रम, स्थापत्य, प्रदर्शन, पुस्तक, मासिक आणि इतर प्रकाशन, चित्रपट अथवा चलचित्र सादरीकरण, खेळ, संवादमाध्यम (interfaces) किंवा डिजिटल आणि इतर प्रकारातील कलानिर्मिती करणे यांचा समावेश असेल.
   *अर्थसहाय्य (Budget)*: जास्तीतजास्त रुपये ५,००,०००/-
   *कॅलेंडर*: प्रस्ताव, वर्षातून एकदा, खुल्या स्पर्धेतून, मागविण्यात येतील.

3. **कार्यशाळा, निवासी कार्यक्रम, परिसंवाद**:
   वैचारिक आदानप्रदान, संवाद, चर्चा, शिक्षण आणि शैक्षणिक वृद्धी (mentorship) यांना प्रोत्साहन मिळेल अशी परिस्थिती आणि वातावरणनिर्मिती करणे. यांत, अशा निवासी कार्यक्रमांचा समावेश असू शकतो ज्यांत कलाकार तयार केले जातील, सहकार्याला प्रोत्साहन मिळेल आणि प्रयोगिकतेला वाव मिळेल; कार्यशाळा, परिसंवाद आणि इतर स्वरूपाची संमेलने, ज्यांत ज्ञानवृद्धी, दृष्टीकोन तयार करणे आणि कलानिर्मितीचा प्रसार करणे हे घडू शकेल.
   *अर्थसहाय्य (Budget)*: जास्तीतजास्त रुपये ३,००,०००/-
   *कॅलेंडर*: प्रस्ताव, वर्षभर स्वीकारले जातील.

4. **कला व्यासपीठे**:
   प्रत्यक्ष किंवा इतर प्रकारे संबंध वृद्धिंगत करणे आणि जागा उपलब्ध करून देणे ज्यांत एका किंवा वेगवेगळ्या कलाप्रकारातील कलाकार नात्यातील वीण घट्ट करण्यासाठी, सृजनासाठी आणि निरंतर चालेल अशा योजनांसाठी एकत्र येऊ शकतील.
   *अर्थसहाय्य (Budget)*: जास्तीतजास्त रुपये १,५०,०००/-

*कॅलेंडर:* प्रस्ताव, वर्षभर स्वीकारले जातील.

*(कदाचित, आयएफएने पूर्वी राबविलेल्या कार्याच्या प्रसारासाठी, अर्थसहाय्य दिले जाऊ शकते. असे प्रकल्प, प्रोग्रॅम ऑफिसरशी, चर्चा करून तयार केले जाऊ शकतील. अर्थसहाय्य प्रकल्पानुसार ठरविले जाईल.)*

**प्रस्ताव कोण पाठवू शकेल?**
या कार्यक्रमांतर्गत प्रस्ताव कोणत्याही प्रांतातील किंवा एकापेक्षा अधिक प्रांतात कार्यरत असणारे पाठवू शकतील. यामध्ये खालील लोकांचा समावेश असू शकतो:

- संगीत, ध्वनी, लेखन, नृत्य, चळवळ, नाट्य, बाहुल्यांचा खेळ, गोष्टी सांगणारे, जादूगार, सर्कस आणि इतर कलाप्रकारातील कलाकार
- चित्रपट (माहितीपट आणि कथेवर आधारित), ॲनिमेशन, छायाचित्रकार, प्रदर्शननिर्माते, नवमाध्यम हाताळणारे, कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence), यांत्रिकनिर्मिती (robotics), संवादात्मक कलाप्रकार, खेळ, चित्रकला, शिल्पकला, printmaking, कॉमिक्स आणि इतर दृश्यकला प्रकारातील कलाकार.
- संग्राहक (Curators), विशेषकरून जे संग्रहालयाच्याऐवजी इतरत्र बाहेर कार्यरत आहेत ते.
- साहित्याशी निगडीत कवि, कादंबरीकार, नाटककार
- निरनिराळ्या कलाप्रांतात एकत्रितपणे काम करणारे कलाकार

**पात्रता**
प्रस्ताव पाठवायची पत्रात भारतीय नागरिकत्व ही आहे. तुमचे प्रस्तावित सहकारीसुद्धा भारतीय नागरिक असणे अनिवार्य आहे. अधिक माहितीसाठी, इथे क्लिक करा

शंका किंवा चौकशीसाठी, सुमना चंद्रशेखर यांच्याशी sumana@indiaifa.org किंवा जॉन झेवियर्स यांच्याशी john@indiaifa.org इथे संवाद साधू शकता.

किंवा तुम्ही इथेही संपर्क साधू शकता:
Programme Officer, Arts Practice
India Foundation for the Arts
'Apurva' Ground Floor, No 259, 4th Cross
Raj Mahal Vilas 2nd Stage, 2nd Block
Bangalore – 560 094
Phone: 080-2341 4681 / 82